# नवीन वर्षासाठी बोध

अरुण जेटली
विरोधी पक्षनेते (राज्यसभा)

2014 साली भारताचे राजकारण आणि प्रशासनीक दृष्ट्या नोंदपात्र आणि अनोखे कसे असेल? भारतीय जनतेच्या अपेक्षा खुप वाढल्या आहेत. मजबुत अभिप्राय असलेल्या वर्गात फक्त भारतीय मध्यम वर्ग एकटाच नाही. भारतात अन्य वर्गातील जनतेच्या अपेक्षा काहीशा वेगळ्या आहेत. त्या सुद्धा वाढल्या आहेत. तो वर्ग भारतीय राजकारण, सार्वजनिक जीवनातील व्यक्ती आणि प्रशासन यांच्या गुणवत्तेचे मुल्यांकन कठोरपणे करतो. त्यांच्या इच्छा-आकांक्षा संतोषजनक पूर्ण झाल्या नाहीत तर ते सरकारविरुद्ध मतदान पण करु शकतात अशी शक्यता आहे.

नुकत्याच झालेल्या चार राज्यांच्या विधानसभा निवडणुकीच्या निकालाने हा मुद्दा सिद्ध झाला आहे. खास करुन श्री शिवराज सिंह चौहान यांनी मध्यप्रदेशातील मुख्यमंत्री पदावरुन यशस्वीपणे कामगीरी केल्यामुळे त्यांच्यावरची विश्वसनीयता वाढून ते तीस-यांदा विजयी झाले. अन्य कोणत्याही पक्षाला इतकी मते मिळाली नाहीत. तर डॉ. रमण सिंह यांच्या व्यक्तिगत विश्वसनीयतेच्या जोरावर भाजपाला विजय मिळाला. या दोन्ही मुख्यमंत्र्यांनी जनतेची सेवा चांगल्या प्रकारे केली. राजस्थानमध्ये कॉंग्रेस पक्षाची सरकार मंत्री आणि आमदारांच्या गैरवर्तनामुळे घेरली गेली होती. त्या राज्यात मतदारांचा संदेश स्पष्ट होता. सामाजिक आणि राजकीय एकमत असण्याबरोबरच अन्य गोष्टींची महत्त्वपूर्ण गरज असते. त्यामुळे सर्वात महत्त्वाच्या गोष्टीबाबत विश्वसनीयता राहते.

दिल्लीत, कॉंग्रेस सरकारने त्यांची विश्वासार्हता गमावली. दिल्ली हे गेल्या तीन वर्षात भ्रष्टाचार-विरोधी चळवळीचे केंद्र बनले होते. कॉंग्रेस पक्ष त्याबाबतीत निष्फळ ठरले होते. त्यामुळे कॉंग्रेसचा पराजय स्पष्ट दिसत होता. सामान्यतः भाजपाला स्पष्ट बहुमत मिळेल असे वाटले होते मात्र मतदाराचा एक वर्ग नवीन वैकल्पिक विचाराच्या प्रभावाला आकर्षित झाला. ती विचारधारा म्हणजे आम आदमी पक्ष. त्या पक्षाने नोंद घेण्यासारखी मते मिळविली. परंपरागत राजकारणी गुणवत्तेसमोर मतदाराने शांतपणे विरोध केला. भाजपाला सर्वात अधिक जागा मिळाल्या, मात्र दिल्ली निवडणूक निकाल म्हणजे भाजपासाठी आत्मपरिक्षण करणे आहे. व्यक्तिगत उमेदवाराला त्या राज्यातील जनतेच्या अपेक्षेप्रमाणे खरे उतरावे लागेल. दिल्लीत पक्ष नेते म्हणून डॉ.हर्षवर्धन यांच्यावर सोपविण्यात आलेली जबाबदारी त्या दिशेने योग्य असे पाऊल आहे. भाजपने राष्ट्रीय पक्ष म्हणून निवडणूक खर्चासाठी लहान देणगी घेण्यासाठी 10 करोड घरांशी संपर्क साधण्याचा निर्णय घेतला आहे. तर दिल्लीत पक्षाला स्वतःच्या विश्वसनीयतेला मजबुत करण्यासाठी आणखी प्रयत्न करावे लागतील.

नव्या वर्षाचा राजकीय संदेश विश्वसनीयता आहे. पण कॉंग्रेसने अजुनही त्यांच्या चुकांमधून बोध घेतलेला दिसत नाही. चार राज्यांत पराजयाची हार पत्करावी लागणा-या कॉंग्रेसने दोषींना सावरण्याच्या कृत्याने नवीन वर्षाची सुरुवात केली आहे. महाराष्ट्र सरकारने आदर्श घोटाळ्यात अनेक कॉंग्रेस नेत्यांवर ठपका ठेवणा-या तपास आयोगाच्या अहवालावर अंमल करण्यास नकार दर्शवला होता. त्यामुळे सार्वजनिक अभिप्राय आणि विश्वसनीय राजकारण यादरम्यान जनतेच्या अपेक्षांची अवगणना करण्यात येत आहे. हिमाचल प्रदेशाचे मुख्यमंत्री श्री विर भद्र सिंह यांच्यावरील भ्रष्टाचारांच्या आरोपाबाबत पण हेच करण्यात आले.

कॉंग्रेस पक्षाने बेशरम बनून कलंकित मुख्यमंत्र्यांना पाठिशी घालण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबतीतला जनाक्रोश वाढत आहे, कारण त्यात सिद्धांताची अवगणना होत आहे.

जनतेला स्पष्ट रुपाने विश्वसनीय राजकारण पाहिजे आहे. जनतेच्या अपेक्षांची अवगणना करणे हे कॉंग्रेससाठी एक जोखीम आहे.